# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०१/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील हेटी सावंगी ग्रामपंचायत सावनेर येथे दि. १९.०१.२२ चे २०.३० ते दि. २०.०१.२२ चे ११.०० वा. दरम्यान उपविभागीय जलसधारण सिंचन विभाग कळमेश्वर येथील मौजा हेटी शिवारातील पो. प. बंधा–याला पाणी अडविण्याकरीता लावलेले लोखंडी फळया ४७ नगापैकी १५ नग लोखंडी फळया प्रत्येकी किमंत २,५००/–रु. असा एकुण ३७,५००/–रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कमलाकर देवराव आसोले वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ नांदागोमुख ता. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो.न ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा घोगरा येथे दि. २४.०१.२२ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिल शालिकराम काटोले, वय ४२ वर्ष, रा. लोहारा ता.नरखेड जि.नागपुर हे घोगरा येथील दान कॉटेक्स नावाचा जिमींग मध्ये संचालक असुन सदरची जिम ही जुन २०२० पासुन जळुन अपघात झाल्याने बंद आहे. फिर्यादीचा भाउ निलेश काटोले याने फोनद्वारे माहिती दिली की, एक ४० ते ४५ वर्षाचा अनोळखी ईसम सदर जिमच्या वॉलकंपाउंड मध्ये ठेवलेले २० किलो वजनाचे लोखंडी वजन (बट) किमंती १,५००/–रू. त्याच्या जवळील हिरो होंडा स्पेलंडर मोटारसायकल वर बांधुन घेवून जातांना दिसला. त्याला आवाज देवुन पाठलाग केला असता तो पळुन गेला. अशी माहिती मिळाल्याने फिर्यादीने जिमच्या वॉलकंपाउंड मध्ये ठेवलेल्या वजनांची पाहणी केली असता वजनापैकी एक २० किलो वजनाचे लोखंडी वजन (बट) कमी मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस शिपाई प्रजोत तायडे मो.नं. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर